| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 20 Jul 2026 | What does home insurance cover during th e monsoon? | Kesari (Marathi) |

# पावसाळ्यात गृह विमा काय कव्हर करतो?

## पावसाळ्यात वाढते धोके

पावसाळा आपल्यासाठी सुखद असला तरी, तो भारतीय घरांसाठी विजेच्या संदर्भात अनेक धोके घेऊन येतो. या काळात वीजपुरवठ्यातील चढ-उतार, वायरिंगमध्ये पाणी शिरणे आणि वीज पडणे यांसारख्या समस्या सामान्य आहेत. आपले एअर कंडिशनर्स, रेफ्रिजरेटर्स, गिझर्स आणि पंख्यांसारख्या विद्युत उपकरणांवरील अवलंबित्व कायम राहते, परंतु ओलावा आणि अस्थिर वीजपुरवठा यामुळे विशेशत: घरे असुरक्षित बनतात.

दिल्ली अग्निशमन दलाच्या आकडेवारीनुसार, जवळजवळ ६०% आगी या शॉर्ट सर्किट, ओव्हरहिटिंग, ओव्हरलोडिंग, निकृष्ट दर्जाची उपकरणे, बेकायदेशीर वायर जोडणी आणि खराब इन्स्टॉलेशन यांसारख्या विद्युत दोषांमुळे लागतात. पावसाळ्यात दमट हवामानामुळे वायरचे इन्सुलेशन कमकुवत होते आणि ठिणग्या पडण्याची शक्यता वाढते, ज्यामुळे हे धोके अधिक तीव्र होतात. ओव्हरलोड झालेली सर्किट्स आणि देखभालीकडे दुर्लक्ष यामुळे आगीचे संकट वेगाने वाढू शकते. त्यामुळे घराचे, केवळ आर्थिक गुंतवणूक म्हणूनच नव्हे, तर कौटुंबिक आठवणींचा ठेवा म्हणूनही रक्षण करणे ही व्यावहारिक गरज बनली आहे.



**गुरदीप सिंग बात्रा**
हेड, कमर्शियल अंडररायटिंग, रिस्क इंजिनिअरिंग सर्व्हिसेस आणि ग्लोबल अकाउंट्स, बजाज जनरल इन्शुरन्स

## गृह विमा : घराच्या विद्युत नुकसानापासून संरक्षण

विद्युत दोषामुळे लागलेल्या आगीच्या घटनांमध्ये गृह विमा महत्त्वपूर्ण आर्थिक संरक्षण देतो. जर एखाद्या उपकरणाने ठिणगी पडून आग लागली, तर पॉलिसी घराच्या बांधकामाचे नुकसान भरून काढते. यामध्ये फर्निचर, इलेक्ट्रॉनिक्स आणि मौल्यवान वस्तू यांसारख्या घरातील सामानाचेही संरक्षण समाविष्ट असू शकते. विशेष म्हणजे, पावसाळ्यातील वारंवार घडणारा धोका – वीज पडणे – यामुळे लागलेल्या आगीचाही विमा संरक्षणामध्ये सहसा समावेश असतो.

विद्युत धोक्यांव्यतिरिक्त, गृह विमा एक व्यापक सुरक्षा कवच म्हणून काम करतो. भारतात भूकंप, चक्रीवादळ, पूर, वादळ आणि अतिवृष्टी यांसारख्या नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढत असताना, गृह विमा घेतल्यामुळे पावसाळ्यातील अनपेक्षित आपत्तींविरुद्ध घर सुरक्षित राहते.

## विम्याची व्याप्ती

बहुतेक गृह विमा पॉलिसी व्यापक संरक्षण देतात, ज्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो:

**नैसर्गिक आपत्ती:** आग, पूर, भूकंप, वादळ, वीज पडणे, भूस्खलन आणि त्सुनामी.

**मानवनिर्मित जोखीम:** दंगल, चोरी, तोडफोड, अपघाती नुकसान, आग आणि जाणीवपूर्वक केलेले नुकसान.

पॉलिसीमध्ये घर राहण्यायोग्य न राहिल्यास तात्पुरत्या निवासासाठी अतिरिक्त भाडे किंवा भाड्याचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई मिळू शकते. यामुळे दुरुस्तीच्या काळात मानसिक ताण कमी होतो आणि कुटुंबाला आर्थिक नुकसानाचा भार एकट्याने सहन करावा लागत नाही. विम्याचे हप्ते खूप परवडणारे आहेत, जे एक लाख रुपयांच्या कव्हरेजसाठी साधारण १० रुपयांपासून सुरू होतात, ज्यामुळे ही एक व्यावहारिक आर्थिक सुरक्षा ठरते.

## घरातील सामान आणि विद्युत उपकरणांसाठी कव्हरेज

गृह विमा छतावरील सौर पॅनेलसह घरातील विद्युत उपकरणे, फर्निचर आणि फिटिंग्ज यांसारख्या सामानाचेही संरक्षण करतो. कव्हर केलेल्या जोखमींमुळे उपकरणांचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई मिळते. बांधकामाचे नुकसान अनेकदा विद्युत उपकरणांवर परिणाम करते, अशा नुकसानापासून संरक्षण मिळते.

मात्र, जर वीजपुरवठ्यातील चढ-उतार किंवा ओव्हरलोडमुळे आग लागली, तर घर आणि घरातील सामानाचे नुकसान 'ऑल रिस्क कव्हर' आणि/किंवा 'मशिन ब्रेकडाऊन' पॉलिसीअंतर्गत कव्हर केले जाते, परंतु ज्या विशिष्ट उपकरणामुळे आग लागली ते उपकरण वगळले जाते. संपूर्ण संरक्षणासाठी, घरमालकांनी अशा ॲड-ऑन्ससह विमा वाढवण्याचा विचार केला पाहिजे, विशेषतः पावसाळ्यात जेव्हा उपकरणे अधिक असुरक्षित असतात.

पावसाळा आपल्या घराची असुरक्षितता अधोरेखित करतो. दमट वायरिंगमुळे होणारे शॉर्ट सर्किट, इलेक्ट्रॉनिक्सचे नुकसान करणारे अचानक वीजपुरवठ्यातील चढ-उतार आणि छताचे व उपकरणांचे नुकसान करणारी वीज – हे धोके दुर्लक्षित करण्यासारखे नाहीत. गृह विमा हे एक आर्थिक साधन आहे, जे सुनिश्चित करते की तुम्हाला नुकसानाचा भार एकट्याने सहन करावा लागणार नाही. हे आर्थिक अनिश्चिततेचे रूपांतर तयारीमध्ये करते, ज्यामुळे घर, घरातील सामान सुरक्षित राहते आणि आपत्कालीन काळात तात्पुरत्या निवासासारखी मदत मिळते. केवळ दुरुस्तीचा खर्च भरून देण्यापेक्षा, एक सर्वसमावेशक पॉलिसी कुटुंबाला खराब हवामानात मनःशांती प्रदान करते. वादळे अनपेक्षितपणे येतात अशा जगात, विश्वासार्ह विमा संरक्षण असणे म्हणजे तुम्ही भविष्यातील कोणत्याही संकटासाठी तयार आहात.